स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार , मुंबई-४०० ०३२.

Email ID : napu12.mhpds@gov.in                                    दूरध्वनी क्र .022-22793053

---

क्रमांक : रवका-१५२२/प्र.क्र.११०/नापु-१२                                    दिनांक : २७ सप्टेंबर, २०२२

प्रति,

मे.

विषय:- महत्त्वाचे अभिलेख व नस्त्यांचे स्कॅनिंग करण्यासाठी निविदा सादर करणेबाबत.

महोदय/ महोदया,

महत्वाचे अभिलेख, अ व ब वर्ग नस्त्या यांचे स्कॅनिंग करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. अभिलेख व नस्त्या हे गोपनीय दस्तऐवज असल्यामुळे ते मंत्रालयाबाहेर नेता येणार नाही. त्यांची विभागात स्कॅनिंग करणे आवश्यक आहे.

२. तरी इच्छुक निविदाकारांनी अभिलेख व नस्त्या स्कॅन करण्यासाठी प्रति पान किती रक्कम आकारण्यात येईल. याबाबत आपले दर (करांसहित) सादर करावेत. सदर दरपत्रके सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावीत.लिफाफ्यावर अभिलेख व नस्त्या स्कॅन करण्यासाठी दरपत्रके असे नमूद करण्यात यावेत व लिफाफ्यावर व दरपत्रकावर निविदाकार संस्थेची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे. दरामध्ये खाडाखोड करता कामा नये.

- निविदा प्रसिध्द केल्याचा दिनांक :- २७ सप्टेंबर, २०२२
- निविदा सादर करण्याचा कालावधी :- ४ ऑक्टोंबर, २०२२, सायं.६.१५ पर्यंत
- निविदा उघडण्याचा दिनांक :- ६ ऑक्टोंबर, २०२२ सायं.४.०० वाजता

३. सदर निविदा कक्ष अधिकारी, नापु १२ , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, विस्तार इमारत, पोटमाळा, रुम. नं. M-२ , मंत्रालय, मुंबई-३२ या ठिकाणी स्वत: अथवा पोस्टाने सादर करण्यात यावीत. सदर निविदा उपसचिव, नापु १२, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दुसरा मजला, विस्तार इमारत, मुंबई-३२ या ठिकाणी उघडण्यात येतील. दरपत्रके उघडतेवेळी आपण स्वत: किंवा आपल्या संस्थेचा एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो. प्राप्त निविदा

स्विकारणे, कोणतेही कारण न देता नाकारण्याचे व निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकारी सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी राखून ठेवलेले आहेत. खालील कागदपत्रे स्वतंत्र लिफाफ्यात (दरपत्रक लिफाफ्याव्यतिरिक्त) सादर करणे आवश्यक आहे.

१. उद्योग आधार नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र

२. GST प्रमाणपत्र

३. निविदाकार संस्था/विक्रेत्याचे पॅनकार्ड

४. निविदा फी/अनामत रक्कम रु.५००/- भरलेल्याची पावती. (ना-परतावा) (सदर अनामत रक्कम रोख शाखा, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागं, विस्तार इमारत, पोटमाळा, रुम. नं. M-२ , मंत्रालय, मुंबई-३२ या ठिकाणी भरण्यात यावी.)

५. शासकीय कार्यालयात स्कॅनिंगचे काम केल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र.

६. मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र.

४. तसेच निविदा प्राप्त झाल्यानंतर विभागाने दर मान्य केल्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थेची नियुक्ती करण्यात येईल. अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

२७.९.२०२२

(महेश जाधव)
कक्ष अधिकारी

## अटी व शर्ती

१. विभागातील अभिलेख/नस्त्या यांचे स्कॅनिंगचे कामकाज मंत्रालयीन इमारतीमध्ये करावयाचे आहे. त्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व मनुष्यबळ संस्थेने पुरवणे आवश्यक आहे.

२. किमान २ शासकीय विभागात स्कॅनिंगचे काम केल्याचा अनुभव आवश्यक आहे.

३. दर करार केल्यानंतर अभिलेख/नस्त्यांची सर्व पृष्ठे व्यवस्थित स्कॅनिंग करण्याची तसेच पाने गहाळ होणार नाही, याची संपूर्ण जबाबदारी करार करणाऱ्या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच सदर कालावधीत संस्थेने जास्तीचा दर न आकारता देयक विभागास सादर करावे.

४. स्कॅनिंगचे काम पूर्ण न करता संस्थेने सेवा खंडीत केल्यास याबाबतचा कोणताही मोबदला देय राहणार नाही. तसेच याबाबत योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

५. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

६. स्वीकृत पुरवठादार संस्थेने स्कॅन केलेला डाटा कायमस्वरुपी संग्रही ठेवण्यासाठी एक डाटा सर्व्हर मध्ये व दुसरा डाटा बॅकअप मध्ये असेल. सदर डाटा पेनड्राईव्हमध्ये व हार्ड डिस्कमध्ये उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

७. पुरवठादार संस्थेने संस्थेचा संपूर्ण तपशील, स्कॅनिंगचे काम करणाऱ्या मनुष्यबळांचा तपशील सादर करणे आवश्यक आहे.

८. स्कॅनिंग करणाऱ्या कागदपत्रांच्या तपशीलाकरिता नोंदवही ठेवणे आवश्यक राहिल.

९. दरकरार करतेवेळी रु.२०,०००/- रक्कमेचे बँकी हमीपत्र देणे आवश्यक राहील.

****